आदेश

आरोग्य सेवक (महिला) वर्ग 3 या संवर्गातील कर्मचा-यांना 10 वर्षाची नियमित सेवा पुर्ण केल्यानंतर त्यांना पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी (सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना) पहिला लाभ मंजुर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/कार्या 2/आस्था 4/203 /2021
दिनांक 26 मार्च 2021

वाचा :- 1) महाराष्ट्र शासन साप्रवि यांचेकडील शासन निर्णय क्रं. एसआरव्ही /1095/प्र.क्र. 1/95 /12 दि. 08/06/1995
2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1199/प्र.क्र. 2/सेवा 3 दि. 20/07/2001
3) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 2000/प्र.क्र. 10/99/सेवा 3 दि. 03/08/2001
4) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1106/प्र.क्र. 30/सेवा 3 दि. 10/09/2007
5) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1109/प्र.क्र. 43/सेवा 3 दि. 31/08/2009
6) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1109/प्र.क्र. 24/सेवा 3 दि. 09/06/2009
7) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1109/प्र.क्र. 9/01/सेवा 3 दि. 15/10/2009
8) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1109/प्र.क्र. 44/सेवा 3 दि. 01/04/2010
9) महाराष्ट्र शासन वित्त विभागा कडील परिपत्रक क्रं. वेपूर 209 / /प्र.क्र. 69/सेवा 9 दि. 05/05/2010
10) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1109/प्र.क्र. 41/सेवा 3 दि. 05/07/2010
11) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेतन / 1111/प्र.क्र. 8/सेवा 3 दि. 01/07/2011
12) महाराष्ट्र शासन वित्त विभागा कडील शासन परिपत्रक क्रं. वेतन / 2011/प्र.क्र. 41/सेवा 3 दि. 18/08/2011
13) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागा कडील शासन निर्णय क्रं. सेप्रनि - 2010/प्र.क्र. 359/आस्था 9 दि. 05/12/2012
14) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. आप्रयो / 1014/प्र.क्र. 21/सेवा 3 दि. 06/09/2014

15) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील पुरकपत्र क्रं. आप्रयो /1014/ प्र.क्र. 21/सेवा 3 दि. 10/02/2015
16) महाराष्ट्र शासन वित्त विभागा कडील शासन शुध्दीपत्रक क्रं. मप्रन्या - 1015/प्र.क्र. 97/सेवा 3 दि. 10/12/2015
17) महाराष्ट्र शासन वित्त विभागा कडील शासन शुध्दीपत्रक क्रं. आप्रयो / 1015/प्र.क्र. 111/2015/सेवा 3 दि. 23/12/2015
18) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेपुर /1210/ प्र.क्र. 124(भाग -1)/सेवा 9 दि. 09/02/2016
19) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागा कडील शासन निर्णय क्रं. डिएसआर 2017/प्र.क्र. 36/आस्था - 5 दि. 29/03/2017
20) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रं. वेतन-1111 / प्र.क्र. 08/सेवा 3 दि. 11/05/2017
21) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. वेपुर /1210/ प्र.क्र. 124(भाग -1)/सेवा 9 दि. 09/02/2016
22) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. वेतन- 1119/ प्र. क्र. 3/2019 सेवा -3 दिनांक 02/03/2019
23) सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक 08/02/2021

महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय दिनांक 01 एप्रिल 2010 अन्वये वर्ग 3 व वर्ग 4 मधील ज्या जिल्हा परिषद कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असुनही पदोन्नती मिळण्यास दिर्घ कालावधी लागतो अशा कर्मचा-यांना वर नमुद शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार दिनांक 01 ऑक्टोबर 2006 पासुन सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वेतन -1119/प्र.क्र. 3/सेवा -3 दिनांक 02 मार्च 2019 अन्वये सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये 10, 20, 30 वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक 01/01/2016 पासून अमलात आलेली आहे.

शासन निर्णय महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन -1119/प्र.क्र. 3/सेवा -3 दिनांक 02 मार्च 2019 अन्वये नियमित केलेल्या योजनेच्या अटी व शर्तींना अधिन राहुन सरळ सेवेने प्रविष्ठ झालेल्या आरोग्य सेवक महिला यांना प्रथम नियुक्तीने हजर दिनांकापासुन 10 वर्ष नियमित सेवा पुर्ण दिनांक / दिनांक 01/01/2016 पासुन पहिल्या लाभासाठी आरोग्य सेवक महिला (वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस 8 रुपये 25500 - 81100) या संवर्गातुन आरोग्य सहाय्यक महिला या संवर्गामध्ये पदोन्नतीची संधी उपलब्ध असल्याने सदर पदाचे वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस 10 रुपये 29200 - 92300 लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. खालील नमुद कर्मचारी यांचे समोरील स्तंभ क्रमांक 5 मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पहिला लाभ मंजुर करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्मचा-याचे नाव	प्राथमिक आरोग्य केंद्र व तालुका	प्रथम नेमणुकीने हजर दिनांक	प्रथम नेमणुकीने हजर दिनांकापासुन 10 वर्षे सेवापुर्ण झाल्याने पहिला लाभ मंजुर दिनांक	शेरा
1	2	3	4	5	6
1	शिंदे संगिता लक्ष्मण	नान्नज, जामखेड	07/01/2010	07/01/2020	
2	वांढेकर आशाबाई देविदास	बारागाव नांदूर, राहुरी	08/01/2010	08/01/2020	
3	तांबे सुजाता बळशीराम	सुगाव खुर्द, अकोले	08/01/2010	08/01/2020	
4	चौधरी दिपाली सुनिल	टाकळीमियॉ, राहुरी	10/01/2010	10/01/2020	
5	आजबे आशा सखाराम	टाकळी खातगाव, अहमदनगर	11/01/2010	11/01/2020	
6	पाटील मिनल केशव	सोनई, नेवासा	05/02/2010	05/02/2020	
7	सय्यद कैसर लियाकत	तिसगाव, पाथर्डी	31/07/2010	31/07/2020	
8	सोले माधवी घनश्याम	धांदरफळ खुर्द, संगमनेर	31/07/2010	31/07/2020	
9	जिवडे सीमा देविदास	रुईछत्रपती, पारनेर	02/08/2010	02/08/2020	
10	कुलकर्णी मंजुषा व्दारकानाथ	देवगाव, अहमदनगर	02/08/2010	02/08/2020	
11	नागरे स्वाती भिमाशंकर	कोहणे, अकोले	05/08/2010	05/08/2020	
12	थोरात सुनिता दत्तात्रय	निमगाव जाळी, संगमनेर	21/09/2010	21/09/2020	
13	कसेब ज्योती शरद	दहिगाव ने, शेवगाव	21/09/2010	21/09/2020	
14	बो-हाडे अनिता सुर्यभान	सलाबतपूर	21/09/2010	21/09/2020	
15	बनसोड मनिषा मधुकर	रुईछत्तीसी, अहमदनगर	22/09/2010	22/09/2020	
16	जाधव शकुंतला भाऊसाहेब	उस्थळदुमाला, नेवासा	22/09/2010	22/09/2020	
17	शेंगुले प्रमिला सखाराम	जवळे कडलग, संगमनेर	23/09/2010	23/09/2020	
18	बकाल उज्वला सुरेश	अस्तगाव, राहाता	23/09/2010	23/09/2020	
19	वराळ सुवर्णा पंढरीनाथ	खिरविरे, अकोले	24/09/2010	24/09/2020	
20	तमनर पुष्पा पाटीलबा	बारागाव नांदूर, राहुरी	24/09/2010	24/09/2020	
21	लाडके हिरा सयाजी	लाडगाव, अकोले	25/09/2010	25/09/2020	
22	ताकटे विनया दिनकर	मांजरी, राहुरी	13/10/2010	13/10/2020	
23	वाघमारे सुरेखा बन्सी	कोळगाव, श्रीगोंदा	14/10/2010	14/10/2020	
24	आंधळे कल्पना रामदास	कान्हुर पठार, पारनेर	15/10/2010	15/10/2020	
25	अनारसे भारती सुभाष	राशिन, कर्जत	21/12/2010	21/12/2020	
26	बनसोडे वर्षा सुदाम	कुकाणा, नेवासा	22/12/2010	22/12/2020	
27	पारे वैशाली रावसाहेब	भाळवणी, पारनेर	23/12/2010	23/12/2020	
28	जाधव संगिता सिताराम	देवळाली प्रवरा, राहुरी	19/06/2010	19/06/2020	

अटी व शर्ती

1) संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी कर्मचा-यांचे सलग सेवेचे दाखले, अर्हता परीक्षा, संगणक परीक्षा, स्थायित्व प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, मत्ता व दायित्व विवरणपत्र, खाते निहाय चौकशी बाबतची व इतर सादर केलेले दस्तऐवजानुसार संबंधीत कर्मचा-यांना लाभ अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. याबाबतची खात्री संबंधीत कार्यालय प्रमुखंनी करुन सुधारीत वेतन निश्चिती करावी.
2) सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस -20 पर्यंत वेतन घेणा-या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रुपये 15600- 39100 व ग्रेड पे रुपये 5400/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी / अधिकारी यांना लागू राहील. संबंधीत कर्मचारी / अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस - 21 मध्ये वेतन आहरीत करुन लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
3) या योजनेखाली पात्र कर्मचारी / अधिकारी यांना संपूर्ण सेवा कालावधीत, पात्रतेनुसार तीन वेळा, या योजनेचा लाभ मंजुर करण्यात येईल. मात्र, ज्या कर्मचारी / अधिकारी यांना दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल. थोडक्यात संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून त्यांची एकूण नियमित व सलग सेवा 30 वर्ष असल्यास, या 30 वर्षाच्या कालावधीत झालेल्या कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या, किमान तीन असावी. त्याशिवाय ज्या कर्मचारी / अधिकारी यांना तीन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेअंतर्गत एकही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.
4) या योजनेअंतर्गत एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून झालेल्या संपूर्ण सेवा कालावधीत, संबंधितास सुरुवातीस लाभ मंजुर झाला असल्यास व तदनंतर लाभाच्या वेतनश्रेणीत त्याची कार्यात्मक पदोन्नती झाल्यास, पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय नसल्याने, अशा पदोन्नतीची गणना एकुण तीन कार्यात्मक पदोन्नतीच्या संख्येमध्ये करण्यात येणार नाही.
5) या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस, पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे (शासन निर्णय सा. प्र. वि. दि. 15/12/20017 नुसार), यथास्थिती जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पुर्तता करणे आवश्यक आहे.
6) तीन लाभांच्या योजनेचा पहिला व दुसरा लाभ - ज्या कर्मचारी / अधिकारी यांनी यापूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती कालबध्द पदोन्नती योजना अथवा सेवांतर्गत आशसित प्रगती योजना वा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला वा दुसरा लाभ यापूर्वी घेतलेला आहे, त्यांचे सदर लाभ हे तीन लाभाच्या योजनेखालील प्रकरणपरत्वे पहिला वा दुसरा लाभ समजण्यात येतील.
7) विवक्षित सेवा कालावधीनंतर (After specified number of years of service), संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non-Functional Pay Structure) मंजुर करण्यात आलेला / येणारा, लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ (First benefit of Macps) समजण्यात येईल. उदा. मंत्रालय / विधानमंडळ सचिवालय कक्ष अधिका-यांना चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना. ज्या कर्मचारी / अधिकारी यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसरंचना मंजुर करण्यात आली आहे, त्या पदाला विवक्षित सेवा कालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-यांमध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असले तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ (Second benefit of macps) म्हणून मंजुर करण्यात येईल.

8) पुर्वी 12 व 24 वर्षाच्या सेवेनंतर मिळणारे लाभ, सातव्या वेतन आयोगात 10, 20 व 30 वर्षाच्या सेवेनंतर पात्रतेनुसार अनुज्ञेय केले आहेत. त्यामुळे ज्या कर्मचारी / अधिकारी यांना दिनांक 01/01/2016 पूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजुर झाला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांना उर्वरित यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार, पात्रतेनुसार, अनुज्ञेय राहील.

दि.01/01/2016 पूर्वी 12 वा 24 वर्षाच्या सेवेनंतर घेतलेला लाभ	दुस-या लाभाची अनुज्ञेयता	तिस-या लाभाची अनुज्ञेयता
पहिला लाभ	पहिल्या लाभापासून आठ वर्षानंतर (12 + 8)	दुस-या लाभापासून दहा वर्षानंतर (20 + 10)
दुसरा लाभ	लागू नाही	दुस-या लाभापासून सहा वर्षानतर (24 + 6)

9) ज्या कर्मचा-यास दि. 01/01/2016 ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती 12 वा 24 वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना 20 (12 + 8) व 30 (24 + 6) एवढया वर्षाच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार, यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजुर करण्यात यावा. दि. 01/01/2016 ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना शासन निर्णय वित्त विभाग दि. 01/04/2010 नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे आदेश रदद करुन त्यांना तीन लाभाच्या योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन, फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

10) ज्या कर्मचारी / अधिकारी यांच्या नियमित सेवेची 10 वर्षे दिनांक 31/12/2015 पुर्वी किंवा दिनांक 31/12/2015 रोजी पुर्ण होतील, त्यांना तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिला लाभ हा दिनांक 01/01/2016 रोजी पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल. ज्या कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दि. 01/01/20016 पुर्वीच पहिला लाभ मंजुर केला आहे, अशा कर्मचा-यांना त्यांची 12 + 8 अशी 20 वर्षाची सेवा, ही दि.01/01/2016 पुर्वी पुर्ण होत असल्यास, संबंधीतास दुसरा लाभ (Second benefit on promotional post) दि. 01/01/2016 पासुन पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल. वरीलप्रमाणे ज्या कर्मचारी / अधिकारी यांची 20 वर्षाची सेवा ही दि. 01/01/2016 रोजी व नंतरच्या तारखेस पुर्ण होईल, त्यांना तिसरा लाभ हा दुस-या लाभापासून 10 वर्षानंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर (Third benefit on post) अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार मंजुर करण्यात येईल.

11) ज्या कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि. 01/01/2016 पुर्वीच पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दुसरा लाभ मंजुर केला आहे, अशा कर्मचा-यांना त्यांची 24 + 6 अशी 30 वर्षाची सेवा, ही दि. 01/01/2016 पुर्वी पुर्ण होत असल्यास, संबंधितास तिसरा लाभ दि. 01/01/2016 पासुन पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच ज्यांची तिस-या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी 30 वर्षाची सेवा ही दि. 01/01/2016 रोजी व नंतरच्या तारखेस पुर्ण होत असल्यास, त्यांना संबंधित तारखेस पात्रतेनुसार तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

12) दि. 01 जोनवारी 2016 व त्यानंतरच्या पदोन्नतीच्या वेळी, म.ना.से. (सुधारीत वेतन) नियम, 2019 या अधिसुचनेतील नियम क्रमांक 13 नुसार वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्यामुळे त्याच

तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेमध्ये वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

13) एकाकी पदावरील कर्मचारी / अधिकारी यांना यापुर्वीच्या योजनेनुसार दि. 01/01/2016 पुर्वीच पहिला लाभ मंजुर केला आहे, अशा कर्मचा-यांना त्यांची 20 (12 + 8) वर्षाची सेवा ही दि. 01/01/2016 पुर्वी पुर्ण होत असल्यास, संबंधितास दुसरा लाभ हा सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) दि.01/01/2016 पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

14) दि. 01/01/2019 पुर्वी शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना दि .01/01/2019 रोजी व नंतर तीन लाभाच्या योजनेतील यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ हा पात्रतेनुसार, सातव्या वेतन आयोगाच्या वेतनमॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

15) सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील सुधारणा तसेच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि. 01/01/2016 पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे जे कर्मचारी व अधिकारी हे पुर्वीच्या योजनानुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेऊन दि. 01/01/2016 पुर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत / मृत्यू पावले आहेत, त्यांना यथास्थिती 12 + 8 व 24 + 6 याप्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. तथापि ज्या कर्मचारी / अधिकारी यांना कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, यांचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ हा दि. 31/12/2015 पुर्वी प्राप्त होऊन ते दिनांक 01/01/2016 रोजी वा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त झाले आहेत / मृत्यु पावले आहेत, अशा कर्मचारी / अधिकारी यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती 8 वर्षाची सेवा तसेच 6 वर्षाची सेवा ही त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस / मृत्यूच्या तारखेस पुर्ण होत आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

16) एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि. 01/01/2016 ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती 12 वा 24 वर्षाच्या सेवेनंतर पहिला अथवा दुसरा लाभ मंजुर झाला आहे, त्यांना 20 (12+8) व 30 (24+6) एवढया वर्षाच्या सेवेनंतर पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) मंजुर करण्यात यावा.

17) एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि.01/01/2016 ते सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना शासन निर्णय वित्त विभाग दि. 05/07/2010 नुसार यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजुर केला आहे, त्याबाबतचे आदेश रदद करुन, सर्व संबंधितांस, सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार, सदर लाभ सुधारीतरित्या मंजुर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

18) दि.01/01/2019 रोजी व नंतर शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर अथवा एकाकी पदावर किंवा एकाकी संवर्गावर, सरळसेवा प्रवेशाने नियुक्त होणा-या कर्मचारी / अधिकारी यांना यथास्थिती 10, 20 व 30 वर्षाच्या नियमित सेवेनंतर, सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार, वेतन मॅट्रीक्समधील विदयमान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ, हे पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरतील.

19) वरील सर्व प्रसंगांमध्ये वेतनमॅट्रीक्समधील एस -20 या वेतनस्तरामध्ये वेतन आहरित करेपर्यंतच, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांस यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल, पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना एस -21 हा वेतनस्तर लागू झाला कि, त्यास त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

20) संबंधित कर्मचारी / अधिकारी, तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिल्या वा दुस-या वा तिस-या लाभाच्या आनुज्ञेयतेसाठी, गोपनीय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहीत केल्यानुसार राहील. तसेच वर्ग -4 मधील कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरीता सामान्य प्रशासन विभागाने विहीत केले आदेश तसेच धोरण विचारात घेऊन संबंधितांची या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता तपासण्यात येईल.

21) या योजनेचा पहिला अथवा दुसरा लाभ मिळाल्यानंतर कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यांनतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर, तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणूकाही एकाकी पद आहे असे समजुन संबंधित कर्मचा-यास त्यांचा वेतनमॅट्रीक्समधील, विदयमान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार) अनुज्ञेय लाभ, पात्रतेनुसार मंजुर करण्यात येईल.

22) कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्न्तीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी / अधिकारी यांस भविष्यात होणा-या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्न्तीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून 10 वर्षांच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहीत अटी व शर्तीच्या पुर्ततेनंतर, या याजेनेअंतर्गत यथास्थिती पहिला / दुसरा / तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजुर करण्यात येईल.

23) या योजनेखाली पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापी अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 12 च्या तरतुदीनुसार करण्यात यावी.

24) रोजंदारीवरील, कार्यव्ययी आस्थापनेवरील, कंत्राटी तत्वावरील व तदर्थ (Ad-hoc) नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

25) संबंधीत कर्मचा-यांकडून छोटया कुटूंबाच्या व्याख्येनुसार दोनच अपत्ये आहेत, याबाबत संबंधीत कार्यालय प्रमुखांनी वेतन निश्चिती करतांना याबाबतची खात्री करावी. दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांना अपात्र करण्यात येऊन वरीलप्रमाणे मंजूर केलेला लाभ देण्यात येऊ नये व वैयक्तीक माहिती लपवून ठेवल्याने त्यांचेवर उचित शिस्तभंगाची कारवाई करावी.

26) संबंधीत कर्मचा-यांकडून भविष्यात प्राप्त होणा-या प्रचलित शासन निर्णयानुसार व लेखा परिक्षणामध्ये वेतन श्रेणीबाबत अतिप्रदाना संबंधीत वसुली निघाल्यास सदर वसुली करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुखांची राहील, तसेच अशा प्रकारची वसुली करुन देण्यास सहमती असलेबाबत अशा आशयाचे बंधपत्र घेऊन वेतन निश्चिती करण्यात यावी.

27) संबंधीताकडून करारनामा करुन घेणेकामी सोबत नमुना जोडला आहे.

28) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील परिशिष्ट 5 महिला आरोग्य प्रचारक या पदांसाठी नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पुढीलप्रमाणे आहेत. महिला आरोग्य प्रचारकांच्या पदांवरील नेमणुक ही ज्या सहाय्यक परिचारीका प्रसाविका हया अ) सहाय्यक परिचारीका प्रसाविका यांनी पढती प्रशिक्षण पाठयक्रमानंतर घेतलेली परिक्षा उत्तीर्ण झाल्या असतील आणि ब)

महाराष्ट्र परिचारीका परिषदेकडे ज्यांची नोंदणी झालेली असेल किंवा अशी नोंदणी होणेस ज्या पात्र असतील अशा मधुन पात्रतेनुसार वरिष्ठताक्रमांच्या आधारे योग्य त्या व्यक्तीला पदोन्नती देवुन करण्यात येईल. तथापी महाराष्ट्र शासन सार्वजनिका आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक बढती 2002/पक्र.क्र.225/सेवा -5 दिनांक 27 फेब्रुवारी 2003 व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक एपीटी 2044/प्र.क्र.2840/ आस्था 8 दिनांक 22 जुलै 2004 अन्वये आरोग्य सेवक महिला यांना आरोग्य सहाय्यक महिला या पदाची वेतनश्रेणी मंजुर करण्यासाठी सहा महिने प्रशिक्षणाची अट खालील अटींच्या अधीन राहून शिथिल करण्यात आलेली आहे. अ) 12 वर्षे नियमित सेवा पुर्ण केलेल्या परंतु प्रशिक्षणाची संधी उपलब्ध न झालेल्या सहाय्यक परिचारीका प्रसाविकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ त्यांची 12 वर्षाची नियमित सेवा ज्या दिनांकास पुर्ण होईल त्या दिनांकापासून अनुज्ञेय राहिल. तथापि भविष्यात सेवा ज्येष्ठतेनुसार विहित प्रशिक्षण देण्यात आल्यावर ते पुर्ण करुन विहित परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ काढून घेण्यात येईल. ब) महिला आरोग्य अभ्यंगता या पदावरील पदोन्नतीकरिता प्रशिक्षण पुर्ण करणे व विहित परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथील करण्यात आली असली तरी त्या व्यतिरिक्त शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेतन 1999/प्र.क्र.2/99/सेवा -3 दिनांक 20 जुलै 2001 अन्वये विहित केलेल्या इतर सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे. क) पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण नाकारलेल्या तसेच प्रशिक्षणानंतरची परिक्षा उत्तीर्ण न झालेल्या सहाय्यक परिचारीका प्रसाविका यांना या योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय राहणार नाही.

सदर आदेशाची नोंद संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवुन सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202103261000 ------ असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती सर्व संबंधीत कर्मचारी यांना कार्यालय प्रमुखामार्फत
द्वारा व प्रत :- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सर्व ता.
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर,
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, सर्व

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर